# वसंतोत्सव

आम्रतरुच्या पानाआडून कोकीळ सांगतो सर्वांना ।
वसंत आला, वसंत आला, वसंतोत्सव आला ना - - - - - ॥धृ॥

रुक्ष वृक्ष ही हसू लागले फांद्या फांद्यातून ।
नवी पालवी दिसू लागली अंगा खांद्यातून ॥
लोभस रंग तो हिरवा हिरवा मोहवितो मना मना ।
वसंत आला, वसंत आला, वसंतोत्सव आला ना . . . . . ॥१॥

ग्रीष्माचा तो ताप तामसी ।
विसरली धरा जरा जरासी ॥
स्वागत करीता वसंताचे हर्ष मनीतो मावेना ।
वसंत आला वसंत आला, वसंतोत्सव आला ना - - - - ॥२॥

उवल्या चोचीत चोच घालुनी ।
किलबिल करीती चिमण्या मधुनी ॥
बालपक्षी ही नाचू लागले टिपती दाणा दाणा ।
वसंत आला, वसंत आला, वसंतोत्सव आला ना . . . . . - - ॥३॥

पहाटवारा पूर्व दिशेचा ।
गंध पसरवी प्रकाशाचा ॥
स्पर्शे त्याच्या पुलकीत अवघे रोम रोम झाले ना ।
वसंत आला, वसंत आला, वसंतोत्सव आला ना - - . . . ॥४॥

माध्यान्हीचा सूर्य तापला ।
परि ढगाआडून स्निग्ध जाहला ॥
मुग्ध होऊनी मातीचा कण, काही काहीच बोलेना ।
वसंत आला, वसंत आला, वसंतोत्सव आला ना - - - - ॥५॥

प्रियजन सारे सखे सोबती ।
आनंदाचा उत्सव करीती ॥
सान थोर मिळूनी करीती, मधुर गीत गायना ।
वसंत आला, वसंत आला, वसंतोत्सव आला ना - . . . . ॥६॥

सौ. शोभा पांडे
गुरु गणेश नगर, कोथरूड पुणे
9405438339